# राशिभविष्य - मे, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==========================================================

**सूचना -** प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रासाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून, श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही प्रयत्न करून पाहावा व आपणांसही
तसा अनुभव आल्यास कृपया कळवावे, ही विनंती

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर, लहरी, धाकदडपण सहन न होणारा असा घडला असण्याची शक्यता दिसते. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर झाली असावीत असे वाटते. तसे असेल तर पालकांनी त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. हे सर्व या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे होईल. त्याशिवाय प्रथम स्थानी असलेले रवि-बुध या महिन्याच्या काळात अनारोग्यकारक व मनस्तापदायक होणे संभवते. वाढता खर्च, वित्तहानी, अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या, नियोजित कामात होणारी पीछेहाट अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. काही मंडळींना डोळ्याचे दुखणे, तर काहींना रक्तदाब, हृदयविकार अशापैकी आजार होणे संभवते. जपा. बुधामुळे भांडणे, मित्रद्रोह, कुसंगती, यांचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. धनस्थानी स्वराशीत असलेल्या शुक्रामुळे कौटुंबिक जीवनात मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे हातून काही कर्तृत्व घडेल व उत्साह वाढेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. शिवाय महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात बुध ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी केतु असल्यामुळे या राशीच्या काही मंडळींचे आचरण "वरून कीर्तन, आतून तमाशा" असे ढोंगी, धूर्त स्वरूपाचे होणे संभवते. शिवाय या केतूमुळे संततिसुखात बाधा येणेही शक्य आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी स्वराशीत असलेल्या शनीमुळे व महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रथम स्थानी असल्याने या महिन्याच्या काळात काही अविस्मरणीय घटना घडण्याची शक्यता दिसते. बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना मानसन्मान, वरिष्ठांकडून कौतुक होणे असे काही मिळणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. पण काही भाग्यवंत मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूची प्राप्ती होणे संभवते. पण हा मंगळ मैत्रीत वितुष्ट निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र अश्विनी असणारांनी "ओम अश्विनी कुमाराभ्याम नमः:" मंत्राचा, भरणी जन्मनक्षत्र असणारांनी " ओम यमाय नमः: मंत्राचा तर कृत्तिका जन्मनक्षत्र असणारांनी " ओम अग्नये नमः: " मंत्राचा १०८ वेळा जप करावा. तसेच स्नान झाल्यावर "श्रीगणेश अथर्वशीर्षा" चे पठण करावे व रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करावे.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रवि -बुध - हर्षल- राहू-केतु हे पाच ग्रह मनस्तापदायक आहेत. रवीमुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता , कशाचे तरी भय अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल. बुधामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मानहानी होणे, मूळचे कर्ज असेल तर त्यात वाढ होणे, मनस्थिती चंचल होणे, त्यामुळे अनारोग्य होणे, मित्रद्रोह होणे, काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, कोणास नको त्या प्रसंगाला तोंड द्यावे लागणे, तर कोणास जीवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागणे, अकारण शत्रुत्व निर्माण होणे, अशापैकी घटना घडण्याची दाट शक्यता आहे. राहूमुळे घरात वाद, भांडणे, आर्थिक समस्या अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. शिवाय अपघात भय असल्याने घरीदारी सतत सावधानतेने आचरण करा. वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. वाहन चालवत असताना मोबाईलवर वार्तालाप करू नका. या केतूमुळे काही मंडळींना त्वचारोगाचा किंवा रक्तविकाराचा आजार होणे संभवते. काहींना मुखरोगाचा आजार होणेही शक्य आहे. अशा प्रतिकुल परिस्थितीत ज्यांना यापूर्वीचाच रक्तदाब वा हृदयविकाराचा आजार असेल त्यांनी मन व विचारशक्ती प्रयत्नपूर्वक शांत, स्थिर राखली पाहिजे. तसेच काळ प्रतिकुल आहे याची सतत जाणीव ठेवून सहनशील बनून व शांत राहून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत असलेल्या मंगळ ग्रहामुळे . स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना व औषधविक्रेत्यांना काही प्रमाणात काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी स्वतः:च्या मकर राशीत असलेला शनि ग्रह फारसा प्रतिकुल होणार नाही. उलट या शनीमुळे काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या शनीबरोबर असलेला गुरु ग्रह ज्यांना अध्यात्माची मनापासून ओढ आहे त्यांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र कृत्तिका असणारांनी “ओम अग्नये नमः “मंत्राचा, रोहिणी जन्मनक्षत्र असणारांनी “ओम ब्रह्माय नमः “ मंत्राचा तर मृग जन्मनक्षत्र असणारांनी “ओम सोम सोमाय नमः “ मंत्राचा १०८ वेळा जप करावा. तसेच स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करावे. आणि रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी राहू असून सप्तम स्थानी केतू आहे.हे दोन्ही ग्रह मानसिक दृष्ट्या तापदायक असून राहूमुळे अपमान झाल्यास सूडबुद्धी अस्वस्थ करील. शिवाय या राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात व्ययस्थानी असलेला बुध प्रथमस्थानी आल्यावर मनस्थिती चंचल होणे मित्रद्रोह होणे संभवते. काही मंडळींना कुसंगतीची बाधा त्रस्त करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या केतुमुळे मनस्थिती अस्वस्थ होईल व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. ज्यांची कोर्ट प्रकारणे असतील त्यांनी ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. काळ प्रतिकुल असल्याने पदरी अपयश येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत शनि - गुरु असे दोन ग्रह असून शनीमुळे क्वचित कोणास एखादा मोठा आजार होणे संभवते. काही मंडळींना अपेक्षाभंगाचे दु:ख सहन करावे लागेल. असमाधानकारक घटना घडतील. त्यामुळे मनस्थिती अशांत राहण्याची

शक्यता आहे. अशा परिस्थितीत शनीसह असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला मंगळ प्रवासास प्रतिकुल असल्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मानहानी होणे, मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत रवि -बुध - हर्षल असे तीन ग्रह आहेत. येथील हर्षल गुरु या शुभ ग्रहासह असल्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण इतर बाबतीत निश्चित असे काही घडेल याची खात्री देता येणार नाही. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल असणार आहे. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-बुध ग्रह प्रतिकुल होतील व त्यामुळे मनाविरुद्ध घटना घडल्यास नैराश्य येणे, दु:ख होणे, मनस्थिती अस्वस्थ होणे संभवते. त्यामुळे काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होणेही शक्य आहे. जपा. पण व्यय स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्रामुळे
मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान
करताना जन्मनक्षत्र मृग असणारांनी “ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा, आर्द्रा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम नमः: शंकराय नमः:” मंत्राचा तर पुनर्वसू जन्मनक्षत्र असणारांनी “ओम आदितिये नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा. शिवाय श्री गुरुदेव दत्तात्रेयाची उपासना म्हणून. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “”चे पठण करावे.

**(४) कर्क -** या राशीच्या व्ययस्थानी राहू असून षष्ठ स्थानी केतू आहे. हे दोन्ही ग्रह अनुकुल असून राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूपासून रक्षण होईल. पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. महिन्याच्या अखेरच्या काळात बुध ग्रह व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. तसे घडल्यास नियोजित कामात अपयश येणे, मानहानी होणे, अनारोग्याचा त्रास होणे अशा प्रकारचे मनस्ताप सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. पण केतूच्या अनुकुलतेने परिस्थिती आटोक्यात राहील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी शनि -गुरु ग्रह प्रतिकुल नसले तरी गुरु ग्रह नीच राशीत राशिस्वामीसह असल्याने विवाहयोगात दिरंगाई होणे, प्रेमसंबंधात अडथळे येणे, आर्थिक लाभात अडथळे येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला मंगळ अनारोग्यकारक असून धोकादायक होणे संभवते. त्याच्यामुळे काही मंडळींना उष्णता विकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना मूळव्याधीचा आजार होणे संभवते. शिवाय हाडमोड होणेही शक्य दिसते. त्याशिवाय वीज, पाणी यांपासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने व काळजीपूर्वक हाताळा. . तसेच शक्यतो जलप्रवास करू नका. खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. या राशीच्या दशम या नोकरी-व्यवसाय स्थानी रवि -बुध -हर्षल असे तीन ग्रह आहेत. रवि ग्रह पूर्णपणे अनुकुल असून शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना विविध प्रकारे लाभदायक होईल. दिलेल्या जबाबदारीच्या कामात यशस्वी होणे, त्यामुळे वरिष्ठ प्रसन्न होणे व त्यातून बढती, पगारवाढ, काही मंडळींना एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणेही शक्य आहे. मोठ्या अधिकारी व्यक्तीशी ओळख होणेही लाभदायक होईल. बुधामुळे मानसिक सुखशांती लाभेल. कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ व मित्रलाभ होणेही संभवते. पण लाभस्थानी असलेला बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर

प्रतिकुल होईल व त्यामुळे काही मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या दशम स्थानी असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेला स्वराशीतील शुक्र सर्व प्रकारे अनुकुल असून सर्व प्रकारे सुखसमाधान देणारा असल्याचाच अनुभव येईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र पूनर्वसू असलेल्यांनी " ओम अदितीये नमः: " मंत्राचा, पुष्य जन्ममक्षत्र असणारांनी " ओम बृहस्पतये नमः:" मंत्राचा तर आश्लेषा जन्मनक्षत्र
असणारांनी " ओम सर्पाय नमः:" मंत्राचा १०८ वेळा जप करावा. शिवाय स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे व रात्री "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करावे.

**(५) सिंह -** या राशीच्या पंचम स्थानी केतू असून लाभस्थानी राहू आहे. केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. राहूमुळे नोकरीत अधिकारपदावर असलेल्यांनी अधिकाराचा स्वार्थासाठी गैर वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच जुगाराचा नाद असलेल्यांनी तो मोह टाळावाच. नपेक्षा लाभ न होता नुकसान होणेच संभवते. तसेच या राशीच्या मंडळींच्या संततिसुखात राहूमुळे बाधा येण्याची शक्यता आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध ग्रह लाभस्थानी गेल्यावर परिस्थितीत बदल होईल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि असला तरी ती गुरु ग्रहाची नीच राशी असल्यामुळे शनिमुळे अनारोग्य होण्याचीच शक्यता आहे. हे शनि -गुरु ग्रह दशम या व्यवसाय स्थानास पूरक असले तरी त्यामुळे गैरसमजुती, भांडणे, वाद होऊन शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यताच अधिक आहे. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेला मंगळ जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज, भांडणे अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत रवि -बुध-हर्षल असे तीन ग्रह आहेत. पैकी महिन्याच्या पूर्वार्धात रवि त्याच्या उच्च राशीत असला तरी फारसा अनुकुल होणार नाही. बुध पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे, नियोजित कामात अडथळे, अडचणी, दिरंगाई होणे संभवते. पण हर्षल ग्रह मात्र शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर इच्छा आकांक्षा पूर्ण होतील, हाती घेतलेल्या कामात यश प्राप्त होईल, धनलाभ होईल व मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण येथे स्वराशीत शुक्र असला तरी स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यावसायिक प्रगतीत अडचणी, अडथळे येण्याची शक्यताच अधिक आहे. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवतची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. तसेच दररोज सकाळी स्नान करताना मघा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम पितराय नमः:" मंत्राचा, पूर्वा जन्मनक्षत्र असणारांनी _ओम भगाय नमः:" मंत्राचा व उत्तरा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम आर्यमे नमः:" मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत केतू असून दशम स्थानी मिथुन राशीत राहू आहे. मिथुन राशीत असलेला राहू नोकरीव्यवसायास अनुकुल असून यशदायक आहे त्यामुळे या राशीच्या कर्तृत्ववान मंडळींना नोकरीत अधिकारपद मिळू शकेल. तर काही भाग्यवंत मंडळींचा सन्मान होणेही संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात दशम स्थानी बुध ग्रह आल्यावर नोकरीव्यवसायातील सुखाबरोबर कौटुंबिक सुखसमाधानही लाभेल. . पण चतुर्थस्थानी असलेला केतू मात्र गृहसौख्यात बाधा निर्माण करील. घरात कोणाशी पटणार नाही. सतत कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय विषभय असल्याने .खाण्यापिण्याची विशेष दक्षता घेणे जरूरीचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि असला तरी ती गुरु ग्रहाची नीच राशी असल्याने दोन्ही ग्रह फारसे अनुकुल होण्याची शक्यता दिसत नाही. शनि बुद्धिमान असला तरी बुद्धी स्वार्थी, व्यवहारी, संशयी होणे संभवते. तसेच गुरु अनुकुल असला तरी तो प्रेमिकांचे प्रेमसंबंध वाढू देण्यात यशस्वी होण्याची शक्यता दिसत नाही. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात अपेक्षित प्रगती करता येण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना ताप येणे, काहींना अंगावर फोड येणे, काही मंडळींना रक्तविकाराचा तर काहींना पोटविकाराचा किंवा हृदयविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शारीरिक इजा होणे, चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, आर्थिक हानी होणे अशापैकी घटना घडणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत रवि -बुध -हर्षल असे तीन ग्रह आहेत. रवि -हर्षल हे दोन ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून या राशीची काही मंडळी भावनेच्या भरात कोठे तरी भरकटत जाण्याची शक्यता आहे. तसेच मुलांपैकी कोणाचे गंभीर आजार, हाती घेतलेल्या कामात येणारे अपयश, इच्छा आकांक्षा अपूर्ण राहणे अशा घटना घडल्यास अधिक अस्वस्थता येईल. हर्षलमुळे अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे जरूरीचे होईल. महिन्याच्या प्रथम सप्ताहात बुध ग्रह अनुकुल असल्याने थोडे सुखसमाधान लाभेल; पण दिनांक ८ पासून तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी स्वराशीतील शुक्र व अष्टम स्थानातून भाग्यस्थानी आलेले रवि -बुधही असणार आहेत. शुक्र ग्रह अनुकुल असल्यामुळे काही मंडळींना गुरुकृपा, तर काहींना थोरकृपा, सुसंगती, ऐषाराम प्राप्त होईल. काही भाग्यवंत मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही संभवते. पण रवि -बुध प्रतिकुल असल्यामुळे महिन्याचा उत्तरार्ध मनस्तापजनक जाण्याचाच संभव आहे. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र उत्तरा असणारांनी १०८ वेळा “ओम आर्यमे नमः: “ मंत्राचा, हस्त जन्म नक्षत्र असणारांनी “ओम सूर्याय नमः: “ मंत्राचा जप करावा. तसेच जन्मनक्षत्र चित्रा असणारांनी “ओम त्वष्टे नमः” मंत्राचा जप करावा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(७) तुळा -** या राशीच्या तृतीय स्थानी केतू असून भाग्यस्थानी राहू आहे. राहूमुळे प्रवासयोग येतील; पण या राहूमुळे कुटुंबात भांडणे झाल्यास कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. दिनांक ७ पासून बुध ग्रह भाग्यस्थानी आल्यावर प्रतिकुल होईल व अधिकच मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. केतूमुळे मानसिक दु:ख सहन करावे लागेल. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी मन:शांतीसाठी अध्यात्माकडे लक्ष द्यावे. पण या केतूमुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्याबरोबर नीच राशीतील गुरु ग्रहही आहे. त्यामुळे माता असेल तर मातेस एखादा आजार होणे

संभवते. शिवाय या शनीमुळे कुटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे शक्य आहे. जपा. पण गुरुमुळे मनस्ताप सुसह्य होईल. तरीही नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. या राशीच्या ज्या मंडळींना स्थावरसंबंधी खरेदी- विक्रीचे व्यवहार करण्याची इच्छा आहे त्यांचे तसे व्यवहार होतील, पण त्यांच्या व्यवहारात शनिमुळे अपेक्षापूर्ती होण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ या बौद्धिक राशीत मंगळ ग्रह असून तो वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल; पण तो या राशीच्या इतर मंडळींच्या संततिसुखात बाधा आणण्याची शक्यता आहे. मुलांपैकी कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे आजारपण अशापैकी कारणांनी मनस्ताप होणे संभवते. तसेच काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्येचा त्रास होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या स्थानी मंगळासोबतअसलेला नेपच्यून अध्यात्म व गूढविद्या यांत प्रगती होण्यास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी स्वतः:च्या उच्च राशीत व केंद्रस्थानी असलेला रवि ग्रह भाग्योदयकारक दिसत असला तरी तो अनारोग्यकारक होणे संभवते. शिवाय या स्थानी रवि ग्रहासह बुध व हर्षल असे आणखी दोन ग्रह असल्यामुळे व हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणणारे असल्यामुळे पतिपत्नीत होणारे वाद, भांडणे, कोणाचे विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. मनस्थिती भरकटत गेल्यास काहीही घडू शकेल. जपा. तसेच या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. महिन्याच्या उत्तरार्धात काही काळ बुध ग्रह अनुकुल होईल व काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करताना चित्रा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम त्वष्ट्रे नमः: “ मंत्राचा, स्वाती जन्मनक्षत्र असणारांनी “ओम वांशवे नमः:” मंत्राचा व विशाखा जन्मनक्षत्र असणारांनी “ ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या अष्टम स्थानी राहू असून धनस्थानी केतू आहे. या राहूमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल; तर काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. पण या राहूमुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, भावनेच्या भरात मन वाटेल तसे भरकटत जाणे, हाती घेतलेल्या कामात अडचणी अपयश येणे, संततीविषयक चिंता त्रस्त करणे अशापैकी मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. धनस्थानी असलेल्या केतूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध ग्रह या राशीच्या अष्टम स्थानी आल्यावर काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले रवि -बुध-- हर्षल हे तिन्ही ग्रह दशम या व्यावसायिक स्थानास पूरक असून त्यांच्यामुळे महिन्याचा पूर्वार्ध नोकरी - व्यवसायात खूपच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल होणे संभवते. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. महिन्याच्या उत्तरार्धात भांडणे, अनारोग्य, चिंता, नैराश्य येणे संभवते. ज्यांचा सखोल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन संबंधित नोकरी व्यवसाय आहे अशांनी सतत अति विचार करू नये. नपेक्षा डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शुक्र

ग्रहामुळे विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात ज्यांचे प्रेमसंबंध जुळले आहेत त्यांचे विवाह होतील. प्रवासाचे योग येतील. विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुख लाभेल. जीवनसाथी वा संगिनी कलाकार असल्यास अधिकच सुखसमाधान लाभेल. पण बुध ग्रह काही काळ प्रतिकुल असल्यामुळे काही मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या मंगळ-नेपच्यून ग्रहांमुळे कौटुंबिक जीवनात असमाधानकारक घटना घडणे, गैरसमज, वाद, भांडणे होणे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि-गुरु ग्रहांमुळे भावण्डविषयक चिंता त्रस्त करील किंवा भावंडांपासून होणारा त्रास सहन करावा लागेल. पण शनिमुळे काही मंडळींना उत्तम नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. गुरुमुळे प्रवासाचे योग येतील व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना विशाखा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा, अनुराधा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम मित्राय नमः:” मंत्राचा व ज्येष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम इंद्राय नमः: “ मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा. तसेच स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करावे. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी केतू असून सप्तम स्थानी राहू आहे. राहू-केतूपैकी केतू अनुकुल व सुखकारक असला तरी वाहनांपासून धोका असल्याचे सूचित करतो. पण राहूमुळे मनात कपटी विचार येणे संभवते. तसेच वाममार्ग धनाची अभिलाषा त्रस्त करील. शिवाय हा राहू वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या धनस्थानी शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. शनि ग्रह प्रतिकुल असून गुरु ग्रह नीच राशीत असल्याने निर्बली आहे. त्यामुळे अनुकुल असला तरी त्याच्यामुळे अपेक्षापूर्ती होणार नाही. केवळ कुटुंबात एखादी शुभ घटना घडेल, थोडा अर्थलाभ होईल. इतकेच. मात्र शनीमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व त्यामुळे गूढविद्या व आध्यात्मिक उपासनेस तो अनुकुल होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. मंगळामुळे धैर्य, हिम्मत, कर्तबगारी, महत्त्वाकांक्षा वाढेल. प्रवासयोगही येईल. पण सतत सावधानतेने आचरण करणे जरुरीचे होईल. कारण इजा होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी .मेष राशीत रवि -बुध -हर्षल असे तीन ग्रह आहेत. पैकी महिन्याच्या पूर्वार्धात रवि -बुध प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा त्रास, प्रिय जनांपासून होणारा दुरावा, संततीपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या त्रस्त करील. जपा. पण हर्षल ग्रह उच्च बौध्दिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. हा हर्षल कलावंतांच्या कलेस पोषक असून अंतर्ज्ञान प्राप्तीस अनुकुल होईल. प्रेमप्रकरणात पुढाकार घेणाराही असेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या षष्ठ स्थानी जातील तेव्हा अनुकुल होतील. व दशम या नोकरीव्यवसाय स्थानास पूरक होतील. हितशत्रू पराभूत होतील. कार्यसिद्धी होईल व प्रसिद्धीही मिळू शकेल. पण या षष्ठ स्थानी असलेल्या शुक्रामुळे मात्र या राशीच्या सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना उच्च गुणवत्ता असूनही गुणवत्ता प्रकट करण्याची संधीच मिळणार नाही. उलट या शुक्रात शुद्ध प्रेमभावना नसल्यामुळे सफलता मिळत नाही व त्यामुळे नैराश्य येऊन काही कलावंत एखाद्या व्यसनाच्या आहारी जाण्याची शक्यता असते. जपा. श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळींनी सकाळी स्नान

करताना जन्मनक्षत्र मूळ असेल त्यांनी “ओम निऋतये नमः::” मंत्राचा, पूर्वाषाढा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम उदकाय नमः:” मंत्राचा तर उत्तराषाढा जन्मनक्षत्र असणारानी “ओम विश्वदेवाय नमः “ मंत्राचा श्रद्धेने १०८ वेळा जप करावा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करावे.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी या शनीच्या स्वराशीत शनि असून ती गुरु ग्रहाची नीच राशी असल्याने येथील गुरु अशक्त आहे. तसेच या राशीच्या मंडळींना शनि ग्रहाची साडेसातीही आहे. त्यामुळे या राशीच्या मंडळींना स्वतः:च्या व जीवनसाथी/संगिनीच्या अनारोग्याची चिंता त्रस्त करीतसे दिसते. त्याचप्रमाणे कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास नैराश्य येईल. नियोजित कार्यात अडथळे येणे संभवते. पण काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. पण गुरु ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काळ थोडाफार अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह आर्थिक दृष्ट्या मनस्ताप देणारे व चिंता निर्माण करणारे असल्याचाच अनुभव येईल. शिवाय मंगळामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. डोळ्यात खुपऱ्या वाढणे, घसा, मान, दाढा असे काही दुखणे असे आजार होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत रवि -बुध - हर्षल असे तीन ग्रह आहेत. पैकी रवि -हर्षल हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. हर्षलमुळे आहे त्या परिस्थितीत व अन्य कशातही सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. रविमुळे अनारोग्य, कसले तरी दु:ख, नियोजित कामात अडचणी येणे, दिरंगाई होणे संभवते. शिवाय कौटुंबिक त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे नैराश्य येणेही शक्य आहे. बुध ग्रहामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते; पण हा बुध काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख देऊ शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात हे रवि -बुध या राशीच्या पंचम स्थानी जात आहेत. तेथे स्वराशीचा शुक्र आहेच. हा शुक्र सर्व प्रकारच्या कलाकारांना त्यांच्या कलेतील आनंद व सुखसमाधान देऊ शकेल. पण रवि -बुध संततिविषयक चिंता निर्माण करतील व त्यामुळे मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या षष्ठ स्थानी राहू असून या राहूमुळे हितशत्रूंचा पराभव होईल, इतर जातिधर्माच्या मित्रांपासून लाभदायक घटना घडतील, पण या राहूमुळे मनात कावेबाज, धूर्त विचार येणे संभवते. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार होणेही संभवते. बुधामुळे महिन्याचा अखेरचा सप्ताह लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी केतु आहे. त्यामुळे
स्वभाव लहरी, चंचल होणे संभवते. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकराची उपासना” व ”श्री हनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र उत्तरा भाद्रपदा असणारांनी “ओम विश्वदेवाय नमः: “मंत्राचा, श्रवण जन्मनक्षत्र असणारांनी “ओम श्रीविष्णवे नमः: “ मंत्राचा आणि धनिष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी “ वसवे नमः:” मंत्राचा १०८ वेळा जप करावा. तसेच “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करावे. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. या नेपच्यूनमुळे मन अतिशय हळवे होते. त्यामुळे मानसिक संवेदना अति जलद होत असतील. त्याचा परिणाम म्हणून मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहिरे नैराश्य येत असले पाहिजे. तसे होण्यास

त्याच्या सोबत असणारा अहंकारी, हटवादी , संतापी स्वभावाचा मंगळ ग्रह कारणीभूत आहे. तो नोकरी-व्यवसायास प्रतिकुल असून अकारण श्रम, दगदग करावयास लावणारा आहे. त्यामुळे तो अनारोग्यकारक होणेही संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी रवि -बुध - हर्षल असे तीन ग्रह असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल व लाभदायक होईल. त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ अधिकारी प्रसन्न होतील. त्यामुळे काही मंडळीना बढती पगारवाढ तर क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळू शकेल. बुध ग्रह अकारण शत्रुत्व निर्माण करणारा, धननाश करणारा होणार असला तरी त्याच्यामुळे मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या बुधामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. हर्षल ग्रह उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाचे योग येणेही शक्य आहे. पण रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास, कार्य दिरंगाई, वाढत्या खर्चाची चिंता अशापैकी कारणांनी असह्य
मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण चतुर्थ स्थानी स्वराशीतील शुक्र ग्रह असल्याने काही मनोनुकुल व लाभदायक घटना घडतील. शेतीवाडी असणारांना त्यापासून उत्तम अर्थलाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. पण हा राहू कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी केतू असून तो सर्व प्रकारे अनुकुल होईल व अर्थलाभ, यश मिळू शकेल. प्रवास योग येतील. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या गुरु-शनि ग्रहांमुळे कौटुंबिक त्रास, मनस्तापदायक व मानहानीकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर मन:शांतीसाठी दररोज सकाळी स्नान करताना धनिष्ठा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम वसवे नमः:” मंत्राचा, शततारका जन्मनक्षत्र असणारांनी “ओम वरुणाय नमः:” मंत्राचा व पूर्वाभाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी “ ओम अजैकचरणाय नमः: “ मंत्राचा १०८ वेळा जप करावा. शिवाय स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करावे.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी रवि -बुध -हर्षल असे तीन ग्रह आहेत. येथील हर्षलमुळे मनस्थिती अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी अशी होण्याची शक्यता आहे. तसेच अविचाराने कसेही आचरण होणे व समोरच्याशी अविचाराने फटकळपणे बोलून त्याचा अपमान केला जाणे संभवते. जपा. रवि ग्रहामुळे वाढत्या खर्चाची चिंता, भांडणे, आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. जपा. तसेच काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करीतसे दिसते. बुध ग्रह या स्थानी एक सप्ताहच असल्यामुळे त्याचे परिणाम जाणवणार नाहीत. या राशीच्या तृतीय स्थानी स्वराशीतील शुक्र ग्रह असून दिनांक ७ रोजी बुध व महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या स्थानी येत आहे. त्यामुळे रवि -शुक्र हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व शुक्रामुळे काही मंडळींना भूमिलाभ तर काहींना धनलाभ, मानाचे स्थान व प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह अनुकूल होईल व त्यामुळे या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत सुखसमाधान लाभेल. वरिष्ठ कामावर खूष होतील. आरोग्यसंपन्नता लाभेल. पण बुधामुळे हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी राहू असून दिनांक २४ पासून बुध ग्रह चतुर्थ स्थानी राहूबरोबर असणार आहे. राहू ग्रह कौटुंबिक सुखास व गृहसौख्यास अनिष्ट होणे संभवते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध ग्रह चतुर्थ स्थानी आल्यावर थोडेफार कौटुंबिक सुख, मित्रसुख व गृहसौख्य मिळू शकेल. या

राशीच्या दशम स्थानी केतू असून काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण तो विचार त्यांनी कटाक्षाने मनातून काढून टाकावा आणि आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या लाभस्थानी शनि व गुरु असे दोन ग्रह आहेत. शनि ग्रह सर्वसाधारण्पणे शुभ असला तरी तो संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. गुरु ग्रह अनुकुल व सुखदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी मंगळ व नेपच्यून असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह प्रतिकुल व मानहानीकारक व मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान करताना जन्मनक्षत्र पूर्वा भाद्रपदा असणारांनी "ओम अजैक चरणाय नम:" मंत्राचा, उत्तरा भाद्रपदा जन्मनक्षत्र असणारांनी "ओम अहिर्बुध्न्याय नमः:" मंत्राचा तर रेवती जन्मनक्षत्र असणारांनी " ओम पूषाय नमः: " मंत्राचा १०८ वेळा जप करावा. तसेच श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करावी. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करावे.

**=====ooooo0ooooo=====**